दि. २७.०५.२०१५

# महानिर्मितीच्या विद्युत प्रकल्पांची माहिती :

**उभारणी चालू असलेले औष्णिक वीज प्रकल्प (३२३० मे.वॅ.):**

१. चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ८ व ९ (२ x ५०० मे.वॅ.) :

मुख्य संयंत्राच्या पुरवठा, उभारणी व चाचणीचे आदेश दि. २५.०७.०८ रोजी मे.भेल यांना दिले. उर्वरित संयंत्राच्या (Balance of Plant - BOP) कामाचे आदेश दि.१२.०६.२००९ रोजी मे.बी.जी.आर.लि. यांना दिले.

संच ८ चे 'पूर्ण क्षमतेवर संचलन' प्रकल्पातील महत्वाचा टप्पा दि. २९.०३.२०१५ रोजी झाले व संच ९ चे 'बाष्पक प्रज्वलन' दि.०७.०५.२०१५ रोजी झाले. उर्वरित कामे वेगाने सुरु आहेत.

संच क्र. ९ व १० वाणिज्यिक तत्त्वावर चालविणे अनुक्रमे जून २०१५ व सप्टेंबर २०१५ ला अपेक्षित आहे.

शासनाने, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प- २००७/ प्र.क्र. ११०६/ ऊर्जा - ४ दि. ०५.०३.०८ अन्वये वरिल प्रकल्प उभारण्यास, मान्यता दिली आहे.

२. परळी औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ८ (१ x २५० मे.वॅ.) :

मुख्य संयंत्राच्या पुरवठा, उभारणी व चाचणीचे आदेश दिनांक २०.०१.२००९ रोजी मे. भेल यांना दिले. उर्वरित संयंत्राच्या (एनडीसीटी वगळून) कामाचे आदेश दि. ०१.०१.२०१० रोजी मे. सुनिल हायटेक इंजिनिअर्स लिमिटेड, नागपूर यांना दिले. एन.डी.सी.टी. (फिल्म फील्स सहित) चे आदेश दिनांक ०५.०१.२०१० रोजी मे. गॅमन इंडिया लिमिटेड, मुंबई यांना दिले.

प्रकल्पातील एक महत्वाचा टप्पा 'बॉयलर लाईट अप' दि. २२.०५.२०१५ रोजी पूर्ण झाला. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

सदर संच वाणिज्यिक तत्त्वावर चालविणे जानेवारी २०१६ मध्ये अपेक्षित आहे.

शासनाने, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प - २००८/ प्र.क्र. १४९१/ ऊर्जा - ४ दि. २६.०५.२००९ अन्वये, वरिल प्रकल्प उभारण्यास मान्यता दिली आहे.

३. कोराडी औष्णिक विद्युत केंद्र - संच क्र ८, ९ व १० (३ x ६६० मे.वॅ.) :

मुख्य संयंत्राच्या पुरवठा, उभारणी व चाचणीचे आदेश दि.२३.०९.०९ रोजी. मे.एल.अॅड टी. ला देण्यात आले. उर्वरित कामासाठी (बी.ओ.पी.) चे आदेश दि. २७.०७.२०१० रोजी मे. लॅन्को इन्फ्राटेक लिमिटेड, हरियाणा यांना दिले.

संच ८ चा प्रकल्पातील महत्वाचा टप्पा 'पूर्ण क्षमतेवर संचलन' दि. ३०.०३.२०१५ रोजी झाला व संच ९ चा महत्वाचा टप्पा 'बायलर लाईट अप' दि. १६.०१.२०१५ रोजी झाला. तसेच संच क्र. १० ची 'हायड्रॉलीक चाचणी' दि.०५.०७.२०१४ रोजी झाली. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

संच क्र. ८, ९ व १० वाणिज्यिक तत्त्वावर चालविणे अनुक्रमे जून २०१५, सप्टेंबर २०१५ व मार्च २०१६ ला अपेक्षित आहे.

शासनाने, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प - २००८/ प्र.क्र. ११८९/ ऊर्जा - ४ दि. १४.१०.२००८ अन्वये वरिल प्रकल्प उभारण्यास मान्यता दिली आहे.